ePaper **ठाकरेंनी पाठीत खंजीर खुपसला, धोका देणाऱ्यांना शिक्षा करा, अमित शाहांचा थेट हल्लाबोल**



| वर्ष - 6 । अंक - 147 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | ।सोमवार।दिनांक 5 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



फोडा-झोडा सोडा, तुमचे मिशन मराठी माणसाला गाडा आणि आपला मॉल चालवा ! दुसऱ्यांना फोडाझोडा काय सांगता... पालिकेच्या मराठी शाळा बंद कुणी केल्या? सचिन वाझेला वसूलीला कुणी बसवले? ख्यातकीर्त डॉ अमरापूरकर यांचा बळी कुणी घेतला? संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात मराठी माणसावर गोळ्या झाडणाऱ्या काँग्रेससोबत सत्तेत कोण बसले? फोडा झोडा सोडा, तुमचे तर मराठी माणसाला गाडा आणि आपला मॉल चालवा. हेच मिशन सुरु आहे, त्याचे काय? - आशीष शेलार, भाजप

फक्त दोन जागांसाठी शिवसेनेने २०१४ मध्ये युती तोडली. शिवसेनेने आपल्या जागा पाडून पाठीत खंजीर खुपसला, उद्धव ठाकरेंनी धोका दिला, राजकारणात धोका सहन करु नका, जे धोका देतात, त्यांना शिक्षा झालीच पाहिजे, मुंबईच्या राजकारणात भाजपचंच वर्चस्व राहिलं पाहिजे. आम्ही शिवसेनेला लहान केलं नाही, शिवसेना स्वतःच्या निर्णयांमुळे छोटी झाली, खयाली पु ल ा व शिजवल्यामुळे शिवसेना फुटून त्यांची वाईट अवस्था झाली.

- अमित शहा, भाजपा



## शहरातील दिव्यांग बांधवांसाठी कल्याणकारी योजना...

# दिव्यांग व्यक्तीसोबत लग्न केल्यास 1 लाखाचे अर्थसहाय्य!

## 5 वर्षात 63 जणांनी घेतला योजनेचा लाभ

**पिंपरी । महाईन्यूज ।**

दिव्यांग व्यक्तीशी विवाह केल्यास त्यांच्या संसारासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने 1 लाख रूपयांचे अर्थसहाय्य देण्यात येते. गेल्या 5 वर्षांत या योजनेचा शहरातील 63 जोडप्यांनी लाभ घेतला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. याचबरोबर शहरातील दिव्यांग व्यक्तींसाठी दिव्यांग कक्षामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहे. या योजनांचा शहरातील दिव्यांग बांधवांना मोठा आधार होत असून जीवन सुकर होण्यासाठी लाभ होत आहे. दिव्यांग व्यक्तींना समाजात वावरता अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे 40 टक्यांपेक्षा जास्त अपंगत्वाचे प्रमाण असल्यास अशा दिव्यांगाशी अव्यंग व्यक्तीने विवाह केल्यास त्यांना पालिकेतर्फे प्रोत्साहन म्हणून एक लाख रूपये देण्यात येतात.ही योजना महापालिकेने 2018 पासून सुरू केली असून आत्तापर्यंत 63 जणांनी या योजनेला लाभ घेतला आहे.2018 ला ही योजना सुरू करण्यात आली असली तरी पहिल्या वर्षी एकाही जोडप्याने या योजनेचा लाभ घेतला नाही. त्यानंतर 2019-20 मध्ये 20, 2020-





21 मध्ये 20, 2021-22 मध्ये 19 तर 20202-23 मध्ये जुलैअखेर 4 अशा 63 जणांना 63 लाख रूपयांचा लाभ देण्यात आला आहे. या योजनेसाठी दरवर्षी 20 लाखांची तरतूद करण्यात येते. "दिव्यांग व्यक्तींना दररोजच्या आयुष्यात जगताना अनेक अडी-अडचणींचा सामना करावा लागतो. दिव्यांग व्यक्तींप्रती समाजाचा दृष्टीकोन बदलावा, यासाठी महापालिकेचा समाज विकास विभाग सातत्याने प्रयत्न करत आहे. याच अनुषंगाने दिव्यांग व्यक्तीशी अव्यंग व्यक्तीने विवाह केल्यास त्यांच्या संसाराला हातभार म्हणून पालिका 1 लाखांची मदत करते.

---

# पिंपरी महापालिकेची २६ विसर्जन घाटांवर रुग्णवाहिकांसह वैद्यकीय पथके तैनात

## सहायक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांची माहिती

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड । पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख दहा विसर्जन घाटांवर रविवारपासून (४ सप्टेंबर) वैद्यकीय पथकांसह सुसज्ज रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात येणार आहेत. तर, विसर्जनाच्या दिवशी जवळपास २६ विसर्जन घाटांवर अग्निशमन दलाची





पथके कार्यरत असणार आहेत. शहरातील गणेश विसर्जनासाठी पिंपरी पालिकेची यंत्रणा सज्ज आहे. निगडी प्राधिकरणातील गणेश तलाव, वाल्हेकरवाडीतील जाधव घाट, काळेवाडी घाट, पिंपळे गुरव घाट, वाकड गावठाण घाट, मोशी घाट, चिखली घाट, थेरगाव पूल घाट, पिंपरीतील सुभाषनगर घाट आणि सांगवीतील वेताळबाबा मंदिर घाट याठिकाणी वैद्यकीय साहित्य, औषधे आणि रुग्णवाहिकेसह वैद्यकीय पथक तैनात ठेवले जाणार आहे.

> या वर्षी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करायचा आहे. विसर्जनासाठी पालिकेने केलेल्या विविध व्यवस्थांचा शहरवासीयांनी तथा गणेशभक्तांनी लाभ घ्यावा. शहरातील पर्यावरणप्रेमींच्या सहकार्याने मूर्तिदान मोहीम राबवण्यात येत आहे, त्यात स्वेच्छेने सहभागी व्हावे. प्लास्टिकचा वापर टाळावा आणि नदी व परिसर स्वच्छ ठेवावा.
>
> – शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी पालिका

४ ते ९ सप्टेंबर २०२२ या कालावधीत विसर्जन घाटांवर ही वैद्यकीय पथके कार्यरत असतील, अशी माहिती सहायक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे यांनी दिली. तसेच, अग्निशमन विभागाच्या वतीने शहरातील २६ विसर्जन घाटांवर अग्निशमन दलाचे सुसज्ज पथक तैनात करण्यात आले आहे. क्षेत्रीय कार्यालयांमार्फत स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जन घाटांवर कृत्रिम हौद उभारण्यात आले आहेत.

## गौराई आली सोनपावलांनी...





**वडगाव (मावळ) ।** गौराई आली सोन्याच्या पावलांनी, माणिक मोत्याच्या पावलांनी... असे म्हणत माहेरवाशीण गौरी शनिवारी थाटामाटात घरोघरी आल्या आहेत. गणपतीपाठोपाठ गौरीच्या आगमनाने सारं वातावरण मंगलमय झाले आहे. मावळ तालुक्यातील जांभुळ येथील एक्झर्बिया अबोड या सोसायटीमधील (डी - 2 106) कृष्णा बेंद्रे व (जी-2) 407 राधा कृष्णा लोखंडे यांच्या घरी प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या गौरी पूजनाचे हे विलोभनीय छायाचित्र.

# एक्झर्बिया अबोड गणेशोत्सव मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिरास उत्तम प्रतिसाद!

## महिला-पुरुषांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदवत 34 बॉटल रक्त संकलीत

। वडगाव (मावळ) ।
महाईन्यूज । गणेश क्षिरसागर

कोरोना महामारीनंतर रक्ताचा तुडवडा भासत आहे. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' असा सामाजिक संदेश देत प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तसेच सामाजिक बांधिलकी जोपासत एक्झर्बिया अबोड गणेश मंडळाच्या माध्यमातून अध्यक्ष धनंजन वाणी, सचिन कासार, उपाध्यक्ष दीपक पाटील, खजिनदार पंढरीनाथ हिंगे, मार्गदर्शक सतिश कदम, प्रसन्न शिरोडकर, सचिन कासार यांच्या मार्गर्शनाखाली आणि प्रकाश कांबळे, कार्यक्रमाचे प्रयोजक विशाल गोडसे, युवराज कदम, सल्लागार सचिन शिंदे, अमोल दिसले, सचिव दिनेश सकट, सहसचिव सत्यवान वाळुंज, सचिन कुंभार, सुनील पवार, कृष्णा लोखंडे, चंद्रशेखर शर्मा, सुमीत पुरी, सागर माळकर, नीलेश परदेशी, बाळासाहेब लभडे, सोहेल शेख, रविंद्र उतेकर, पुंजाजी ससाणे, शरद सातपुते, रविंद्र जाधव, राजेश सोळंकी, पियुष पाटील, अजित गोळराखे, नेतृत्वाखाली 4 सप्टेंबर २०२२ रोजी वडगाव मावळ येथील जांभुळयेथील एक्झर्बिया सोसायटी या ठिकाणी भव्य रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले.





सदर रक्तदान शिबिरात संपूर्ण सोसायटीमधील अनेक रहिवाशांनी सामाजिक बांधिलकी जोपासत खूप मोठ्या संख्येने रक्तदान केले. यावेळी एकूण 34 रक्तदात्यांनी रक्तदान केले. यामध्ये 32 पुरुष तर 2 महिलांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान श्रेष्ठ दान करत सहभाग नोंदविला. या रक्तदान शिबिराचे रक्तसंकलन आदित्य बिर्ला मेमोरिअल हॉस्टिपटल चिंचडवच्या यांच्या माध्यमातून करण्यात आले.

**4 सप्टेंबर २०२२ रोजी वडगाव मावळ येथील जांभुळयेथील एक्झर्बिया सोसायटी या ठिकाणी भव्य रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. सदर रक्तदान शिबिरात संपूर्ण सोसायटीमधील अनेक रहिवाशांनी सामाजिक बांधिलकी जोपासत खूप मोठ्या संख्येने रक्तदान केले. यावेळी एकूण 34 रक्तदात्यांनी रक्तदान केले**

### रक्तदान शिबिरात रक्तदान केलेले रक्तदाते

**१)माधुरी सकट, २) शांती जैस्वाल, ३) दिपक पाटील, ४) सुमित पुरी, ५) अमोल देसले, ६) सुनिल पवार, ७) सचिन कुंभार, ८) बाबासाहेब लबडे, ९) सोहेल शेख १०) संजय शिंदे, ११) कृष्णा लोखंडे, १२) शुभम लोखंडे, १३) पुजांजी ससाणे, १४) प्रसन्न शिरोडकर, १५) दिगंबर परदेशी, १६) नीलेश परदेशी, १७) सतेंद्रा गुप्ता, १८) रोहन जांभूळकर, १९) विशाल सूर्यवंशी, २०) सचिन कासार आदी.**

# उद्योगनगरीत विजेचा खेळखंडोबा!

## अघोषित भारनियमनामुळे उद्योगनगरीत लघुउद्योजक त्रस्त



### लघुउद्योजकांच्या वतीने विविध मागण्या

महावितरणच्या कारभारावरून तक्रारी प्रचंड प्रमाणात वाढलेल्या आहेत. या तक्रारीकडे दोन-तीन दिवस कोणीही लक्ष देत नाही, असे सांगत यासंदर्भात उपाययोजना कराव्यात व कायमस्वरूपी कार्यक्षम अधिकारी नेमावेत. पालिका, महावितरण व लघुउद्योग संघटना यांची एक संयुक्त बैठक घेऊन रस्ता खोदाईमुळे येणाऱ्या अडचणींवर तोडगा काढण्यात यावा, अशा विविध मागण्या लघुउद्योजकांच्या वतीने क्षेत्रीय संचालाकासमोर मांडण्यात आल्या.

### एक महिन्यात तोडगा काढण्याचे महावितरण क्षेत्रीय संचालकांचे अधिकाऱ्यांना आदेश

पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।

सतत होणारा विजेचा खेळखंडोबा, अघोषित भारनियमन व इतर अनुषंगिक समस्यांमुळे पिंपरी-चिंचवड शहरातील लघुउद्योजक कित्येक महिन्यांपासून त्रस्त आहेत. यासंदर्भात उपाययोजना करण्यासाठी आयोजित बैठकीत उद्योजकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले.यावेळी मांडण्यात आलेल्या समस्यांवर उत्तर देताना महावितरणच्या क्षेत्रीय संचालकांनी भोसरी, आकुर्डी, निगडी व पिंपरी विभागातील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा व इतर समस्यांवर एक महिन्यात कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे आदेश संबधित अधिकाऱ्यांना दिले.

पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेच्या वतीने शहर औद्योगिक परिसरातील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा व त्यावर कायमस्वरूपी उपाययोजनेसाठी महावितरणचे क्षेत्रीय संचालक अंकुश नाळे यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांच्यासह जयंत कड, प्रवीण लोंढे, संजय ववले, तात्या सपकाळ, सुरेश म्हेत्रे आदी पदाधिकारी, अनेक लघुउद्योजक व महावितरणचे अधिकारी उपस्थित होते. या चर्चेदरम्यान औद्योगिक परिसरात महावितरणने चार सबस्टेशन निर्माण करावेत, अशी मागणी यावेळी क्षेत्रीय संचालकाकडे प्रामुख्याने करण्यात आली.

बैठकीत लघुउद्योजकांच्या वतीने समस्यांची जंत्रीच मांडतानाच काही मागण्याही करण्यात आल्या. फिडरला अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटाव्यात, फिडरच्या वीज वाहणाऱ्या तारांचे झोल कमी करावेत, फिडर पिलर मधील खराब झालेले भाग तसेच खराब झालेले दरवाजे बदलण्यात याव्यात, वेगवेगळ्या साईजच्या केबलचा साठा करून ठेवून गरजेच्या वेळी २४ तास उपलब्ध करून द्यावा, केबलचे दुरुस्तीचे वाहन उपलब्ध करून देणे. आवश्यक तेथे नवीन ट्रान्सफार्मर बसवण्यात यावा. पिंपरी चिंचवड औद्योगिक विभागासाठी मंजूर झालेला महावितरणचा आराखडा कार्यान्वित करावा तसेच नवीन आराखड्यासाठी पाठपुरावा करावा. स्विचिंग स्टेशनची संख्या वाढवावी. भोसरी विभागातील अभियंते व कर्मचारी वाढवावेत, दर महिन्याला आढावा बैठक घ्यावी. थकीत वीज बिलांचे ग्राहकांना सुलभ हप्ते करून द्यावेत. शक्य तिथे भुयारी केबल टाकावी. वीजपुरवठा खंडीत करण्यापूर्वी वीज ग्राहकाला कल्पना द्यावी, आदी मुद्द्यांचा यामध्ये समावेश आहे.

---

# कविता कुठेही सुचू शकते, अगदी स्मशानातही!

### सुचण्याची प्रक्रिया मनात अनेक दिवसांपासून सुरू असते : प्रसिध्द कवी, अभिनेते किशोर कदम उर्फ सौमित्र

पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कविता कुठेही सुचू शकते, अगदी स्मशानातही. मात्र, सुचण्याची प्रक्रिया मनात अनेक दिवसांपासून सुरू असते. उत्कृष्ट कविता सुचण्यासाठी आणि तिच्या सादरीकरणासाठी शब्दसंचय, संवाद कौशल्य आणि चौकस दृष्टीकोन असला पाहिजे, असे मत प्रसिध्द कवी, अभिनेते किशोर कदम तथा सौमित्र यांनी भोसरीतील कविसंमेलनात बोलताना व्यक्त केले.**

भोसरी कला, क्रीडा मंचच्या वतीने आयोजित गणेश महोत्सवाअंतर्गत काव्यमैफिलीत सौमित्र यांनी प्रेक्षकांशी



संवाद साधला. संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी म. भा. चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. पिंपरी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, संस्थेचे अध्यक्ष ॲड. नितीन लांडगे, विजय फुगे, भरत लांडगे आदी उपस्थित होते.

सौमित्र म्हणाले, आपल्या भोवतालच्या परिस्थितीशी आणि निसर्गाशी एकरूप होऊन आनंदाचे क्षण वेचत जगता आले पाहिजे. वैयक्तिक पातळीवर तसेच समाजातील विविध घटकांबाबत घडणाऱ्या घटनांचे विश्लेषण, पडसाद कवींच्या कलाकृतीत दिसतात. माझे बालपण समुद्रकिनारी गेले. त्यामुळे 'लाटा' ही कविता सुचली. एका नाटकाचा सेट उभारताना 'लग्न' ही रचना केली. अभिनय आणि कविता या माझ्या दोन सादरीकरणाच्या बाजू आहेत. कवितेला सन्मान मिळवून देण्यासाठी होणारे उपक्रम निश्चितपणे कौतुकास्पद आहेत.

सौमित्र म्हणाले, आपल्या भोवतालच्या परिस्थितीशी आणि निसर्गाशी एकरूप होऊन आनंदाचे क्षण वेचत जगता आले पाहिजे. वैयक्तिक पातळीवर तसेच समाजातील विविध घटकांबाबत घडणाऱ्या घटनांचे विश्लेषण, पडसाद कवींच्या कलाकृतीत दिसतात. माझे बालपण समुद्रकिनारी गेले. त्यामुळे 'लाटा' ही कविता सुचली.

# लोणावळ्यातून बेपत्ता शाळकरी मुली सापडल्या

### लोणावळा ग्रामीण परिसरातील कुसगाव येथून बेपत्ता झाल्या होत्या दोन शाळकरी मुली

। लोणावळा । महाईन्यूज ।

लोणावळ्यातून बेपत्ता झालेल्या दोन शाळकरी मुलींचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले. ग्रामीण पोलीस तसेच उस्मानाबाद पोलिसांच्या पथकाने ही कामागिरी केली. रेल्वेने उस्मानाबादकडे जात असलेल्या मुलींना ताब्यात घेऊन त्यांना पालकांच्या ताब्यात देण्यात आले.लोणावळा ग्रामीण परिसरातील कुसगाव येथून दोन शाळकरी मुली बेपत्ता झाल्या होत्या. त्यानंतर कुटुंबीयांनी पोलिसांकडे तक्रार दिली. सहायक पोलीस निरीक्षक निलेश माने आणि पथकाने तातडीने तपास सुरू केला.

सीसीटीव्ही चित्रीकरणात पुणे रेल्वे स्थानक परिसरात पनवेल-नांदेड या गाडीतून मुली प्रवास करत असल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी या घटनेची माहिती उस्मानाबाद पोलीस दलातील



अतिरिक्त पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना कळविली. उस्मानाबाद रेल्वे स्थानक परिसरात पनवेल- नांदेड रेल्वे गाडी थांबली. पोलिसांच्या पथकाने मुलींना ताब्यात घेऊन चौकशी केली. मुली सुखरुप असल्याची माहिती मिळाल्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक सचिन राऊळ, घुगे, जय पवार उस्मानाबादला रवाना झाले. पोलिसांनी मुलींना ताब्यात घेतले.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, अतिरिक्त अधीक्षक मितेश घट्टे, लोणावळा उपविभागीय अधिकारी भाऊसाहेब ढोले तसेच अतिरिक्त अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक शेळके, सीताराम डुबल, सहायक निरीक्षक निलेश माने, सचिन राऊळ आदींनी ही कारवाई केली.

## संपादकीय »

# एका निरपराध्याला शिक्षा होता कामा नये!

***शंभर अपराधी सुटले तरी चालतील, पण एका निरपराध्याला शिक्षा होता कामा नये, हे न्यायाचे तत्त्व आहे. तर मुळात शंभर अपराधी निर्माणच होता कामा नयेत, हे कोणत्याही सुसंस्कृत समाजाचे तत्त्व असते. पण तसे होत नाही.***

माणसे असतात, त्यांना भावभावना असतात, अहंकार असतात, लोभ असतात, गंड असतात.. त्या सगळ्यासह ती जगतात तेव्हा एकाचा आनंद हे दुसऱ्याचे दु:ख, दुसऱ्याची वेदना ठरते. गुन्ह्यांची निर्मिती त्यातूनच होते. ते थांबवता येत नसतील तर निदान त्यांचे प्रमाण कमी होईल हे पाहणे आवश्यक ठरते. त्यासाठी गुन्ह्यांच्या नोंदींचा दस्तावेज तयार करणे, तुलनात्मक अभ्यास करणे हे नित्याचे काम असायला हवे. 'एनसीआरबी' म्हणजेच नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरो अर्थात राष्ट्रीय गुन्हे नोंद विभाग ही सरकारी यंत्रणा १९८६ पासून हेच काम करते आणि दरवर्षी देशभरातील गुन्हे, त्यांचे प्रमाण यांच्याविषयीचा आपला अहवाल प्रसिद्ध करते. या वर्षीही एनसीआरबीचा २०२१ या वर्षांतील सर्व प्रकारच्या गुन्ह्यांसंदर्भातील आकडेवारीचा अहवाल प्रसिद्ध झाला असून हे 'पांढऱ्यावरचे काळे' चिंतेत नेहमीपेक्षाही भर घालणारे आहे. तसे का हे पाहण्याआधी 'एनसीआरबी'विषयी थोडेसे समजून घेणे अगत्याचे. देशभरातील गुन्हेविषयक परिस्थितीचा नियमित विदा (डेटा) तयार होत राहावा या हेतूने १९८६ मध्ये स्थापन करण्यात आलेली ही सरकारी आस्थापना केंद्रीय गृह खात्याच्या अखत्यारीत येते. देशभरातून वेगवेगळ्या गुन्ह्यांविषयीची वर्षभरातील माहिती पोलीस ठाणी, जिल्हा पातळीवरील यंत्रणा, राज्य पातळीवरील यंत्रणा असा प्रवास करत एनसीआरबीपर्यंत पोहोचते. तिथे या माहितीचे पृथ:करण होऊन आदल्या वर्षभराचा अहवाल तयार होतो. गुन्हेविषयक वेगवेगळ्या मुद्द्यांवरचे स्थितीदर्शक कल सांगणारा हा अहवाल त्या त्या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी महत्त्वाचा दस्तावेज ठरतो. तो परिस्थिती समजून घेण्यासाठी हातभार लावतोच शिवाय पुढची दिशा ठरण्यासही मदत करतो. अर्थात या सगळ्या प्रक्रियेतही अनेक त्रुटी आहेत. उदाहरणार्थ या सगळ्या अहवालांचा पाया आहे तो पोलीस ठाण्यांत नोंद होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये. या गुन्ह्यांची नोंद कशी होते याविषयी वेगळे काही सांगायची गरज नाही. एखादी व्यक्ती गुन्हा नोंदवण्यासाठी पोलीस ठाण्यात जाते तेव्हा तिला जो अनुभव येतो, त्यातूनच पोलिसी खाक्याबद्दलच्या आख्यायिका गडद होत गेल्या आहेत. गुन्हा नोंदवला गेलाच तर तपास कसा होतो, त्याचे प्रात्यक्षिक प्रत्यक्ष खटल्यातून 'पुराव्याअभावी' गुन्हेगार कसा सुटतो यातून बघायला मिळते. त्यामुळे या यंत्रणेपर्यंत पोहोचून गुन्हा नोंदवणे आणि सगळ्या प्रक्रिया पार करत न्याय मिळवणे हे सामान्य माणसासाठी जिकिरीचेच होऊन बसते.



## आनंदी सकाळ

### अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपं मूकास्वादनवत् प्रकाशते क्वापि पात्रे...

नारदभक्तिसूत्रात अशा भक्तिप्रेमाचे वर्णन -'अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपं मूकास्वादनवत् प्रकाशते क्वापि पात्रे...' असे केले आहे. परब्रह्म सर्वव्यापी, सर्वशक्तिमान, दुष्टदलन, चक्रपाणी, सर्वान्तरयामी, करूणानिधान आहे. त्याचबरोबर परमतत्त्वरूप, आराध्य इष्टदैवत परमप्रेमस्वरूप, माधुर्याचा सागर, परमानंदमय आहे. भक्तासाठी निर्विकार, निर्गुण ब्रह्म, परप्रेमाचा अहर्निश साक्षात्कार बनून प्रेमाचा भुकेला असतो. भक्ताच्या या प्रेमासाठी, प्रेमाच्या अपूर्व सुखासाठी वैकुंठ त्यागून परब्रह्म भक्ताच्या सान्निध्यात रमतो. 'जेथे जातो तेथे, तू माझा सांगाती' बनून परमेश्वर जनाबाईबरोबर दास्यत्वाची कामे करतो. विदुराच्या घराच्या कण्या मिटक्या मारीत खातो. सुदाम्याच्या पोह्यांसाठी सोन्याची द्वारका त्यावरून ओवाळून टाकतो. भक्तप्रेमाच्या सुखभोगासाठी परमात्मा अतिकोमल, अतिकरूण, पूर्णपणे भोळा, भक्तवत्सल, भक्तभिमानी असतो.

# एका चक्रामध्ये अनेक लहान-मोठी चक्रे






एका चक्रामध्ये अनेक लहान-मोठी चक्रे असावीत त्याप्रमाणे भारतीय कंपन्या अनेक उपकंपन्या, त्यांच्या उपकंपन्या अशी उतरंड रचून मालकी विभागतात. यात गैर वा बेकायदेशीर काहीही नाही. पण या सुनियोजित गुंतागुंतीचा एक 'फायदा' असा की त्यामुळे वेळप्रसंगी काही एक मुद्द्यांवर सत्य/तथ्य शोधणे कमालीचे अवघड होऊन बसते. नदी-तलावाचा पृष्ठभाग व्यापून टाकणाऱ्या जलपर्णींची मुळे जशी एकमेकांत गुंतलेली असतात त्याप्रमाणे भारतीय कंपन्यांच्या उपकंपन्यांची गुंतागुंत असते. तिचा पुढचा भाग या 'विश्वप्रधान'ची मालकी बदलल्यावर घडला. ती मालकी ज्या दोन कंपन्यांकडे गेली त्यांचे नेतृत्व करणारे 'रिलायन्स'ची दूरसंचार सेवा कंपनी 'जिओ'शी संबंधित होते. त्यांनी या व्यवहारात 'विश्वप्रधान' जे 'शिनानो'स देणे लागत होती, तेही स्वत:कडे घेतले. ते घेताना प्रत्यक्ष किती पैशाची देवाणघेवाण झाली वा झालीच नाही, याचा तपशील उपलब्ध नाही. परंतु त्यानंतर 'विश्वप्रधान'च्या डोक्यावरील आपले कर्ज फिटल्याचे 'शिनानो'ने जाहीर केले. यातील 'विश्वप्रधान'कडून घेतलेले कर्ज परत फेडण्याची गरज रॉय दाम्पत्यास मुळातच नव्हती.


वास्तव यापेक्षा पूर्ण वेगळे आहे. ते समजून घेण्याच्या प्रयत्नांतील पहिला प्रश्न म्हणजे अदानी समूहाकडे एनडीटीव्हीचे सुमारे २९ टक्के समभाग आलेच कसे? ते ना बाजारातून विकले गेले. म्हणजे त्यांची तेथे उघड खरेदी झालेली नाही. ना एनडीटीव्हीच्या कोणा भागधारकाने आपल्याकडील मालकी अदानी समूहास विकली. तरीही या वाहिनीच्या मालकीतील २९ टक्के इतका मोठा समभाग अदानींकडे गेलाच कसा? त्याचे उत्तर दशकभरापूर्वी एनडीटीव्ही कंपनीचे प्रवर्तक प्रणव आणि राधिका रॉय यांनी घेतलेल्या सुमारे ४०० कोटी रुपयांच्या कर्जात आहे.

त्या वेळी अपरिचित अशा 'विश्वप्रधान कमर्शियल प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीने रॉय दम्पतीच्या कंपनीस हे कर्ज दिले. यानंतरचा नैसर्गिक प्रश्न असा की मुळात या 'विश्वप्रधान'कडे 'एनडीटीव्ही'ला देण्यासाठी ४०० कोटी इतकी-तेही विनातारण कर्जाऊ-भरभक्कम रक्कम आली कोठून? तर ते दिले 'शिनानो रिटेल प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीने. तेही विनातारणच. तर मग 'शिनानो'कडे हे पैसे येण्याचा स्रोत काय? ते दिले 'रिलायन्स इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट्स आणि होल्डिग लिमिटेड' या कंपनीने. तेही अर्थातच विनातारण. आता या नावावरून काय ते स्पष्ट व्हावे. या 'शिनानो'स ज्या 'रिलायन्स' नामक कंपनीने पैसे पुरवले ती 'रिलायन्स'नामे कंपनी मुकेश अंबानी-चलित 'रिलायन्स' समूहाच्या साम्राज्याचा भाग आहे. या सगळ्यांची एकमेकांत इतकी सरमिसळ आहे की बऱ्याच प्रकरणांत त्यांच्या पदाधिकाऱ्यांची नावे वा कार्यालयांचे पत्ते हेदेखील एकसारखे आहेत.

# नमो नमः - दोन दशकांचा लेखाजोखा!

**नरेंद्र मोदी यांनी ७ ऑक्टोबर, २००१ रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. आधी १२ वर्षे मुख्यमंत्री आणि नंतर आठ वर्षे पंतप्रधान, अशी त्यांच्या सलग सत्ता-कारभाराची दोन दशके पुरी झाली आहेत.**

नरेंद्र मोदी यांनी ७ ऑक्टोबर, २००१ रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. आधी १२ वर्षे मुख्यमंत्री आणि नंतर आठ वर्षे पंतप्रधान, अशी त्यांच्या सलग सत्ता-कारभाराची दोन दशके पुरी झाली आहेत. त्यांचा मुख्यमंत्रीपदाचा काळ बाजूला ठेवला तरी सलग दहा वर्षे पंतप्रधान राहणारे ते केवळ चौथे (नेहरू, इंदिराजी, डॉ. सिंग) आणि एकमेव काँग्रेसेतर पंतप्रधान असणार आहेत. हे यश छोटे नाही. या सलगतेपेक्षाही मोदी यांनी या काळात सरकारप्रमुख या नात्याने कशावर भर दिला, कोणत्या नव्या गोष्टी केल्या किंवा सरकारच्या कामाची व कारभाराची दिशा बदलली का, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्यांची उत्तरे देशातील २१ नामवंतांनी, अभ्यासकांनी शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्या अभ्यासलेखांचे संकलन म्हणजे हा ग्रंथ आहे. (माजी) उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांनी मे महिन्यात विमोचन केल्यापासून हे पुस्तक प्रचंड खपते आहे, यात नवल नाही. ते उद्या कदाचित सर्व प्रादेशिक भाषांमध्येही अनुवाद होऊन




येईल. मात्र, याचे महत्त्व म्हणजे या लेखकांमध्ये सुधा मूर्ती, डॉ. देवी शेट्टी, नंदन नीलेकणी, अरविंद पानगढिया असे २२ जण आहेत. हे सारे 'मोदीभक्त' नाहीत. यातले, अर्थतज्ज्ञ पानगढिया तर सरकारची साथ सोडून पुन्हा अध्यापनाकडे वळले. नंदन नीलेकणी काँग्रेसचे लोकसभेचे उमेदवारच होते. भारतरत्न लता मंगेशकर यांनी शुभेच्छापर प्रस्तावना लिहिलेले हे अखेरचे पुस्तकही असेल.

या ग्रंथाचे पाच विभाग करण्यात आले असून त्यात सामान्यांना प्राधान्य, विकास व एकात्मतेची धोरणे, जनधन : अर्थकारण सर्वांसाठी, प्रशासनाचा नवा मनू आणि वसुधैव कुटुंबकम : भारत व जग यांचा समावेश आहे. यातल्या चौथ्या विभागात लिहिताना सुधा मूर्ती या अनेक वर्षांपूर्वी भेटलेली सरला आणि आता भेटलेली तिची मुलगी स्वप्ना यांच्या आयुष्याला झालेल्या विकासाच्या स्पर्शाची ओघवती कथा सांगतात. ही कथा एका अर्थाने सार्वत्रिक आहे. मोदी तीन आठवड्यांनी ७२ वर्षांचे होतील. तरीही, ते 'यूथ आयकॉन' कसे, याचे विश्लेषण बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिने केले आहे. मात्र, ती केवळ क्रीडाक्षेत्रातील यश किंवा वाढलेली पदके यांचा उल्लेख न करता मोदींच्या युवासन्मुख दृष्टिकोनाची चर्चा करते. अर्थव्यवहारांचे जे लोकशाहीकरण झाले व आजही चालू आहे, त्याकडे नीलेकणी लक्ष वेधतात. लोकहितासाठी तंत्रज्ञानाचे उपयोजन करण्यात मोदींइतकी प्रतिभा क्वचितच दिसते, हे उभी हयात आयटी क्षेत्रात घालविलेल्या नीलेकणी यांचे निरीक्षण मोलाचे आहे.

## ।। अभंगवाणी ।।




आहांच वाहांच आंत वरी दोन्ही ।
न लगा गडणी आम्हां तैशा ॥१॥
भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा ।
आवरूनि मना बंद द्यावा ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### टाटा सन्सचे माजी प्रमुख सायरस मिस्त्री यांचे निधन



। पालघर । महाईन्यूज ।

टाटा सन्सचे माजी प्रमुख सायरस मिस्त्री यांचं निधन झालं आहे. पालघरमधील चारोटी येथे झालेल्या अपघातात सायरस मिस्त्री यांनी आपला जीव गमावला. अपघातानंतर जागीच त्यांचा मृत्यू झाला अशी माहिती मिळत आहे. दुपारी सव्वा तीन वाजण्याच्या सुमारासा सूर्या नदीवरील पुलावर चालकाचा ताबा सुटल्याने दुभाजकाला कार आदळून हा अपघात झाला. अपघातात सायरस मिस्त्री यांच्यासह आणखी एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. दरम्यान दोघे जखमी असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी एबीपी माझाशी बोलताना दिलेल्या माहितीनुसार, “दुपारी सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास अहमदाबाद येथून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर सूर्या नदीच्या पुलावर हा अपघात झाला. अपघातात दोघे जखमी झाले असून, दोघांचा मृत्यू झाला आहे. ही मर्सिडीज कार होती. गाडीचा क्रमांक MH-47-AB-6705 असा आहे.

# गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या ... जयजयकारात सांगली संस्थानच्या गणपतीला निरोप

## दरबार हॉलमधून श्रींची पालखीतून विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ

। सांगली । महाईन्यूज ।

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या अशा घोषणा देत रविवारी मोठ्या उत्साहात सांगलीतील संस्थान गणपतीला निरोप देण्यात आला. राजवाड्यातील दरबार हॉलपासून गणेश मंदिर मार्गावरून शाही थाटात सजविलेल्या रथातून श्रींची विसर्जन मिरवणुक काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये लेझीम व झांजपथकासह टाळमृदंगाचा गजर होता.

यंदा निर्बंध हटविण्यात आल्याने शाही मिरवणुक उत्साहात काढण्यात आली. दुपारी विधीवत आरती झाल्यानंतर दरबार हॉलमधून श्रींची पालखीतून विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ झाला. मिरवणुकीमध्ये विजयसिंह राजे पटवर्धन यांच्यासह पटवर्धन परिवार, आ. सुधीर गाडगीळ, महापौर दिग्विजय सुर्यवंशी, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील, जिल्हा बँकेच्या संचालिका जयश्री पाटील, जनसुराज्य शक्ति



**यंदा निर्बंध हटविण्यात आल्याने शाही मिरवणुक उत्साहात काढण्यात आली. दुपारी विधीवत आरती झाल्यानंतर दरबार हॉलमधून श्रींची पालखीतून विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ झाला.**

पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष समित कदम यांच्यासह अधिक्षक दीक्षित गेडाम, अप्पर अधिक्षक मनिषा दुबुले आदी सहभागी झाले होते. मिरवणुकीमध्ये टाळ-मृदंगासह वारकरी, लेझीम पथक, झांज पथक सहभागी झाले होते. गणेश मंदिराजवळ आल्यानंतर पुन्हा श्रींचे पूजन करण्यात आले. गणेश मंदिरापासून टिळक स्मारक मंदिरमार्गे संस्थान गणेशाचे सरकारी घाटावर सुर्यास्तावेळी कृष्णा नदीमध्ये विसर्जन करण्यात आले.

संस्थान गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर अनेक घरगुती मंडळांच्या श्रींचे विसर्जन कृष्णा नदीमध्ये करण्यासाठी गर्दी झाली होती. यावेळी महापालिकेने विविध ठिकाणी विसर्जनासाठी विसर्जन कुंडांची निर्मितीही केली होती.

तसेच मुर्ती दानाचा उपक्रमही राबविण्यात आला. विसर्जनाच्या ठिकाणी निर्माल्य कुंडही ठेवण्यात आले होते. मिरज, कुपवाड शहरात 67 सार्वजनिक मंडळाच्या गणेशाचे विसर्जन आज करण्यात आले.

मिरजेतील गणेश तलावामध्ये विसर्जनासाठी महापालिकेने व्यवस्था केली आहे. उत्सव शांततेत पार पडावा यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# गौरीपूजनानंतर महिलांनी केला पारंपरिक लोकगीतांचा जागर

## गणेशाचे आगमन झाल्यानंतर गौराईचे शनिवारी सोनपावलांनी घरोघरी आगमन

। सांगली । महाईन्यूज ।

माहेरवाशीण म्हणून आलेल्या गौराईचे रविवारी सांगली, मिरजेसह ग्रामीण भागात पूजन करण्यात आले. अनेक घरामध्ये तांब्यासह जेष्ठा व कनिष्ठा गौरीचे मुखवटे सजवून नेत्रदीपक आरास करण्यात आली होती. या निमित्ताने महिलांनी हळदीकुंकू समारंभाचेही आयोजन केले होते. गौराईचे पारंपारिक लोकगीतामधून कोडकौतुक करण्यात महिला मग्न होत्या. गणेशाचे आगमन झाल्यानंतर गौराईचे शनिवारी सोनपावलांनी घरोघरी आगमन झाले. ग्रामीण भागात पाणवठ्यावरून तर शहरी भागात अंगणातून मययाचे तुरे, गौरीची फुले, चाफ्याची पाने तांब्यामध्ये घालून स्वागत करण्यात आले.

घरी आलेल्या माहेरवासीन गौरीला भाजी-भाकरीचा नैवेद्य दाखविण्यात आला. आज सकाळीच जेष्ठा व कनिष्ठा गौरींचे पूजन घरा-घरामध्ये करण्यात आले. सजविलेल्या गौरीच्या मुखवट्यांना नवीन साडी परिधान करून सुवर्णालंकारांनी सजविण्यात आले होते. तसेच तिच्या समोर विविध फळे, शेतातील धान्य, फराळाचे पदार्थ ठेवून पुरण-पोळीचा नैवेद्य दाखविण्यात आला. कुळाचाराप्रमाणे काही घरामध्ये गौरीपूजनानंतर पारंपारिक लोकगीतांचा जागर महिलांनी



केला. यावेळी शेजारी असलेल्या महिलांसाठी हळदी कुंकू समारंभाचे आयोजनही करण्यात आले होते.

## शॉर्ट न्यूज »

### करणी सेनेच्या शहर मंत्र्याची हत्या, ३ आरोपींना अटक

**।नवी दिल्ली।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

नर्मदापुरमच्या इटारसीमध्ये शुक्रवारी रात्री हल्लेखोरांनी करणी सेनेच्या शहर मंत्र्याची हत्या केल्याने खळबळ उडाली आहे. सूरजगंज रोडवर 3 हल्लेखोरांनी मिळून रोहित सिंग राजपूत (28) आणि त्याचा मित्र सचिन पटेल यांच्यावर चाकूने हल्ला केला. आश्चर्याची बाब म्हणजे ज्या वेळी ही हत्या झाली, त्यावेळी लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यापैकी कोणीही हस्तक्षेप केला नाही. मात्र, एका व्यक्तीने या हत्याकांडाचा व्हिडिओ काढला असून तो सोशल माडियावर शेअर केला. हा व्हिडीओ सध्या सोशल माडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. दरम्यान, हत्येची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह ताब्यात घेऊन आरोपीला अटक केली. पोलिसांनी आरोपींची मिरवणूकही काढली. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना शुक्रवारी रात्री 8.15 च्या सुमारास घडली. रोहित त्याच्या मित्रासोबत मुख्य बाजारपेठेत गप्पा मारत बसला होता.

# “भाजपा, आरएसएसने देशाचे विभाजन केले”!

## राहुल गांधींचा केंद्र सरकारवर हल्लाबोल

**।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

“देशातील सामान्य नागरिक गर्तेत अडकला आहे. पंतप्रधान मोदी केवळ दोन उद्योगपतींसाठी काम करत आहेत”, अशा शब्दात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला. देशात वाढती महागाई, बेरोजगारी आणि जीएसटीवरून काँग्रेसच्या वतीनं दिल्लीतील रामलीला मैदानावर हल्लाबोल रॅलीचं आयोजन करण्यात आलं होत. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या रॅलीत मोठ्या संख्येने पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. भाजपा आणि आरएसएसने देशाचे विभाजन केले

“देशात भाजप सरकार आल्यानंतर सामाजिक वातावरण बिघडलं आहे. भाजपा आणि आरएसएसने देशाचे



विभाजन केले. २०१४ पासून भारतात द्वेष आणि संताप वाढत आहे. मोदी सरकार देशातील दोन मोठ्या उद्योगपतींचा फायदा कसा होईल, या उद्देशाने काम करत आहे. मात्र, ‘काँग्रेस पक्ष आणि कार्यकर्ते भाजपा आणि आरएसएसच्या विचारधारेचा एक दिवस पराभव नक्कीच करेल”, असा विश्वास राहुल गांधी यांनी व्यक्त केला.नरेंद्र मोदींना शेतकऱ्यांनी आपली ताकद दाखवली. शेतकऱ्यांची ताकद मोदींना दिसताच त्यांनी कायदा रद्द केला. जीएसटीबाबतही तेच झाले. काँग्रेसला दुसरा जीएसटी आणायचा होता. भाजपाने जीएसटी बदलला. पाच वेगवेगळे कर लादून छोट्या दुकानदारांचे प्रचंड नुकसान झाले.

**ईडी कारवाईवरुन मोदींवर निशाणा**

“आत्ताच कुणीतरी मोदी पंतप्रधान आहेत असं म्हटलं. पण, त्या दोन उद्योगपतींशिवाय, माध्यमांच्या पाठिंब्याशिवाय मोदी पंतप्रधान होऊ शकत नाहीत. मीडिया असो, संस्था असो, सरकार सर्वांवर दबाव आणत आहे. ईडीने मला ५५ तास बसवले. मला मोदीजींना एक गोष्ट समजावून सांगायची आहे की, मी तुमच्या ईडीला घाबरत नाही, मला पर्वा नाही. तुम्ही ५५ तास, ५०० तास किंवा ५ वर्षे ईडी कार्यालयात बसवा, मला काही फरक पडत नाही. संविधान हा देशाचा आत्मा आहे आणि ते वाचवण्याचे काम आज प्रत्येक भारतीय नागरिकाला करावे लागणार आहे.

### भाजपा देश तोडायचं काम करतो

“काँग्रेस पक्ष देशाला जोडायचं काम करतो आणि भाजपा पक्ष देश तोडण्याचं काम करतो. देशात महागाई आणि बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. काँग्रेसप्रणित यूपीए सरकारने देशाला वाचवलं. यूपीए सरकारने देशात मनरेगा योजना आणली नसती, तर देशात हाहाकार माजला असता. आमच्या सरकारने देश व्यवस्थित चालवला. त्यामुळे आज आम्ही भारतीय संविधान आणि देशाला वाचविण्यासाठी लढत आहोत. काँग्रेस पक्ष आणि त्यांचे कार्यकर्ते देशाला वाचवू शकतात. काँग्रेस पक्षाची विचारधाराच देशाचा विकास करू शकते. सत्तेत विराजमान झालेले पंतप्रधान मोदी देशाला कमकुवत करत आहेत”. अशी टीकाही त्यांनी मोदी सरकारवर केली आहे.

### शेतकरी कायद्यावरुन हल्लाबोल

मोदीजींनी नोटाबंदी केली. त्याचा गरिबांना फायदा झाला का? गरिबांच्या खिशातून पैसे काढले. गरिबांना सांगितले की हा काळ्या पैशाविरुद्ध लढा आहे. काही महिन्यांनी तुमच्या खिशातून लाखो करोडो रुपये काढण्यात आल्याचे तुम्ही पाहिले. देशातील बड्या उद्योगपतींची कर्जे माफ झाली. शेतकऱ्यांचे कर्ज माफ होणार नाही. शेतकऱ्यांवर काळे कायदे आणणार. हे कायदे त्यांच्या फायद्याचे आहेत असे म्हणतील. जर ते शेतकऱ्याच्या हिताचे असेल तर भारतात शेतकरी विरोधात का? असा सवालही त्यांनी केला आहे.

# पाकिस्तानात पुराचे थैमान; १३०० जणांचा मृत्यू!

## पाच लाख लोक स्थलांतरित

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानला बसलेल्या पुराच्या तडाख्यात आत्तापर्यंत १३०० नागरिकांनी जीव गमावला आहे. या नैसर्गिक आपत्तीत अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून मोठ्या प्रमाणात बचावकार्य राबवण्यात येत आहे. गेल्या २४ तासात पुरामुळे २४ जणांचा मृत्यू झाला आहे. पाकिस्तानातील बलुचिस्तान, खैबर पख्तुन्वासह दक्षिणेतील सिंध प्रांत पाण्याखाली गेला आहे. सिंध प्रांतात १८०, खैबर पख्तुन्वामध्ये १३८ तर बलुचिस्तानमध्ये १२५ जणांचा पुरामुळे मृत्यू झाल्याचे वृत्त पाकिस्तानातील ‘जियो न्यूज’ने दिले आहे. या पुरामुळे १४ लाखांवर घरांचे नुकसान झाले आहे. या नैसर्गिक संकटात जवळपास सात लाखांहून जास्त प्राणी दगावले आहेत. या संकटात जगातील अनेक देशांकडून पाकिस्तानला मदत केली जात आहे. फ्रान्सने एका विशेष विमानातून पाकला शनिवारी मदत पाठवली आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांकडून पाकिस्तानातील नुकसानाबाबत सर्वेक्षण करण्यात येत आहे. या पुरामुळे तब्बल १० अब्ज डॉलर्सचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



पुराचा तडाखा बसलेल्या ७ लाख २३ हजार कुटुंबांना २५ हजारांची रोख मदत करण्यात आल्याची माहिती पाकिस्तान सरकारमधील मंत्री शाझिया मर्री यांनी दिली आहे. ‘बेनझीर इन्कम सपोर्ट प्रोग्राम’ अंतर्गत पीडितांना मदत केली जात असल्याचे मर्री म्हणाल्या आहेत. बलुचिस्तान, खैबर पख्तुन्वा आणि सिंध प्रांतातील जवळपास पाच लाख लोक तात्पुरत्या उभारण्यात आलेल्या छावण्यांमध्ये राहत आहेत. या पुराने पाकिस्तानचा एक तृतियांश भाग व्यापला आहे. यामुळे जवळपास ३३ लाख लोकांना आर्थिक फटका बसला आहे.

### अमेरिकेत विमान क्रॅश करण्याची धमकी देणारा वैमानिक पोलिसांच्या ताब्यात

**। ।मुंबई ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

अमेरिकेच्या मिसिसिपीमध्ये विमानाच्या वैमानिकाने विमान धडकवण्याची धमकी दिल्याने खळबळ उडाली आहे. वैमानिकाने 9 आसनी विमानाचे अपहरण केले असून तुपेलो विमानतळावरून उड्डाण केले. यानंतर तासभर तो शहरातच विमान उडवत होता. या संदर्भात माहिती मिळताच पोलीस आणि इतर अधिकारी घटनास्थळी पोहोचले. अमेरिकेत विमान अपहरणाच्या घटनेने खळबळ उडाली आहे. अपहरणकर्त्याने धमकी दिली असून, पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ परिसरातील सर्व नागरिकांना बाहेर काढण्यास सुरुवात केली. पुढील सूचना मिळेपर्यंत सर्व नागरिकांना त्या भागापासून दूर राहण्यास सांगण्यात आले आहे.



दरम्यान, या घटनेनंतर अनेक दुकाने रिकामी करण्यात आली. स्थानिक वेळेनुसार पहाटे 5 वाजता ही घटना घडली. वॉलमार्ट स्टोरला धडक देऊन विमान क्रॅश करू अशी धमकी त्या वैमानिकाने दिली होती. पोलीस आणि आपत्कालीन व्यवस्थापक परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. तुपेलो पोलिस विभागाकडून सर्व नागरिकांनी सजग आणि जागरूक राहण्याचे आवाहन करण्यता आले आहे.

# चौकट भेदणारं 'चारचौघी' नाटक ३१ वर्षानंतर पुन्हा रंगभूमीवर..




बाई पणाची चौकट भेदून स्त्रियांची मुक्तता, स्वातंत्र्य आणि बंडखोरपणा यावर निर्भीड भाष्य करणारे एक वादळी नाटक १९९१ रोजी रंगभूमीवर आले. प्रशांत दळवी लिखित आणि चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित 'चारचौघी' या नाटकाने त्यावेळी मोठा इतिहास रचला. हे नाटक काळाच्या इतके पुढचे होते की अनेकांनी त्यावर टीका देखील केली. पण विचारवंतांनी मात्र हे नाटक अक्षरशः डोक्यावर घेतले. नाट्यरसिकांसाठी हे नाटक पुन्हा रंगभूमीवर येत आहे. जवळपास ३१ वर्षांनी हे नाटक पुन्हा एकदा सज्ज झाले आहे.

करोना काळात नाटकावर आलेलं संकट दूर होऊन नाटकाची गाडी आता कुठे रुळावर आली आहे. अनेक नव्या नाट्यकृती रंगभूमीवर येत आहेत. त्यातच एका महत्वाच्या नाटकाची घोषणा करण्यात आली. ३१ वर्षांपूर्वी ज्या नाटकाने इतिहास घडवला होता असे 'चारचौघी' पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित 'चारचौघी' या नाटकात रोहिणी हट्टंगडी, कादंबरी कदम, पर्ण पेठे, निनाद लिमये, श्रेयस राजे, पार्थ केतकर आणि मुक्ता बर्वे असे दिग्गज कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. 'जिगीषा'ने या नाट्य संस्थेने या नाटकाची निर्मिती केली आहे. तर प्रशांत दळवीने या नाटकाचे लेखक आहेत. अशोक पत्की यांनी या नाटकाचं संगीत केलं असून संदेश बेंद्रे यांनी नेपथ्याची धुरा सांभाळली आहे.

# दीपिका-कपिलचा 'मेगा ब्लॉकबस्टर'चा ट्रेलर प्रदर्शित, चाहत्यांना मात्र धक्का

सगळ्यांची प्रतिक्षा अखेर संपली. मेगा ब्लॉकबस्टरचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. कपिल शर्मा आणि दीपिका पदुकोणने काही दिवसांपूर्वी आपल्या आगामी प्रोजेक्ट्सविषयी माहिती दिली होती. त्याचे नाव मेगा ब्लॉकबस्टर होते. त्यासाठी काही दिवसांपासून वातावरणही बनवले जात होते. सर्व गोंधळात पडले होते, की अखेर अनेक कलाकार असलेला प्रकल्प आहे तरी काय? मेगा ब्लॉकबस्टर हे काही चित्रपट किंवा वेब सीरिज नाही. ती तर एक ऑनलाईन शॉपिंग ॲपची जाहिरात मोहिम आहे. काही दिवसांपूर्वी मेगा ब्लॉकबस्टरवरील चर्चेला उधाण आले होते. चाहते त्याचा ट्रेलर पाहण्यास उत्सूक होते. मात्र विचार केला एक आले समोर भलतेच असचं झाले आहे. कॉमेडियन कपिल शर्मा, सौरव गांगुली, रोहित शर्मा, रणवीर सिंग, रश्मिका मंदाना आणि दीपिका पदुकोणचा मेगा



ब्लॉकस्टरबाबतही असेचं घडलं आहे. चाहते विचार करत होते की ही सर्व मोठे कलाकार चित्रपट किंवा वेब सीरिजमध्ये एकत्र दिसतील. मात्र घडल उलटच.

# अमृता खानविलकरने जोडले हात, म्हणाली.. लावणी महाराष्ट्राची ओळख

अमृता खानविलकर आणि लावणी एक वेगळेच समीकरण आहे. मग तो 'नटरंग' चित्रपट असो किंवा नुकताच येऊन गेलेला 'चंद्रमुखी'. तिच्या नृत्याने प्रेक्षकांना वेड लावलं. चंद्रमुखी चित्रपट तर लावणी करणाऱ्या नृत्यांगनेच्या आयुष्यावर असल्याने अमृता ती भूमिका अक्षरशः जगली. या चित्रपटा अमृता खानविलकर (AMRUTA KHANVILKAR)चंद्राच्या म्हणजे प्रमुख भूमिकेत होती. त्यामुळे लावणी कलावंतांचे जगणे, त्यांचा संघर्ष यावर ते भरभरून बोलत असते. आता पुन्हा एकदा तिने लावणी बाबत महत्वाचे विधान केले आहे. लावणीला कमी लेखू नका असे आवाहन तिने लोकांना केले आहे.

परळीच्या नाथ प्रतिष्ठान आयोजित केलेल्या वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये नुकताच अमृता खानविलकरचा लावणी परफॉर्मन्स ठेवण्यात आला होता. मात्र, हा परफॉर्मन्स सादर केल्यानंतर सदर गणेशोत्सव मंडळावर टीका होऊ लागली. त्यानंतर अमृताने पुढे येऊन लोकांना आवाहन केले आहे. आपल्या महाराष्ट्राच्या कलेला बदनाम करू नका, असे आवाहन तिने सर्व प्रेक्षकांना केले आहे.

यावेळी अमृताने लोकांना कळकळीची विनंती केली. अमृता म्हणाली, ट्रोल केल्याने केवळ व्ह्यूज मिळतात म्हणून लावणीला ट्रोल करू नका. लावणीही श्रृंगारिक आहे, हे खरं..मात्र, ती स्पिरिच्युअलसुद्धा आहे, हे लक्षात ठेवा. लावणी ही महाराष्ट्राची



ओळख आहे, तिला बगालबोट लावू नका, असं जाहीर आवाहन तिनं केलं आहे. लावणी ही महाराष्ट्राची ओळख आहे. तिला अशा खालच्या नजरेतून बघणं पाप आहे, असंही ती म्हणाली.

धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या परळीच्या नाथ प्रतिष्ठान गेली सतरा वर्षे वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करत आहे. यंदा गणेशोत्सवामध्ये लावणी.. कव्वाली..भीम गीते आणि हास्य कार्यक्रमांचे मोठे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी अमृताच्या लावणीचाही कार्यक्रम होता. पहिल्याच दिवशी लावणी ठेवल्याने लोकांनी सडकून टीका केली.

# : 'माधुरी मॅम तुम्ही दोन मिनिटं...' अमृताची आई भावूक!


टीव्ही मनोरंजन क्षेत्रातील प्रसिद्ध मालिका झलक दिखला जा... हा आता प्रसिद्धीच्या झोतात आला आहे. त्यामध्ये मराठमोळी अभिनेत्री चंद्रा फेम अमृता खानविलकर सहभागी झाली आहे. काही दिवसांपूर्वी अमृतानं माधुरीसोबत डान्सचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केला होता. त्याला नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसादही मिळाला होता. माधुरी दीक्षितला आपली प्रेरणा मानत नृत्य शिकणाऱ्या अमृताच्या त्या पोस्टचं नेटकऱ्यांनी कौतूकही केले होते. आता शेयर केलेल्या एका व्हिडिओमध्ये अमृताची आई भावूक झाल्याचे दिसून आले आहे. त्यावर आलेल्या चाहत्यांच्या कमेंट्सही चर्चेचा विषय आहे.



त्या व्हिडिओमध्ये चंद्रा फेम अमृता खानविलकरची आई माधुरीला उद्देशुन म्हणतात की, माधुरी मॅम तुम्ही दोन मिनिटं वेळ काढून माझ्या मुलीसाठी स्टेजवर याल का? तुमच्याकडे पाहून ती सारं काही शिकली आहे. मी तुम्हाला असं बोलावणं उचित नाही पण तरीही....यावर माधुरीनं अमृताच्या आईच्या विनंतीला मान देत अमृताचे कौतूक केले आहे. यावेळी अमृतानं देखील आपल्या आईविषयी दोन शब्द सांगितले आहे. माझी आई आज एवढी भावूक का झाली आहे हे मला सांगायचे आहे. पुण्यातील गणेशोत्वापासून माझी डान्स जर्नी सुरु झाली आहे. तेव्हापासून मी माधुरीजी माझे प्रेरणास्थान आहे. माधुरी यांच्या आखिया मिलोओ कभी... या गाण्यावर डान्स केला होता. आज मी एक मध्यमवर्गीय कुटूंबातील मुलगी अभिनेत्री आहे. याचे श्रेय मी माधुरी यांना द्यावे लागेल. यावर अमृता देखील भावूक झाल्याचे दिसून आले आहे. त्या व्हिडिओला आतापर्यंत नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. नेटकऱ्यांनी दिलेल्या कमेंटसही खूप काही सांगून जाणाऱ्या आहेत. यासगळ्यावर माधुरीनं देखील प्रतिक्रिया दिली आहे. तिनं अमृताचं तोंडभरून कौतूक केलं आहे.

# "माझ्या आयुष्यातल्या कित्येक चढ-उतारात..." सुबोध भावेसाठी अमृता सुभाषची खास पोस्ट

मराठमोळी अभिनेत्री अमृता सुभाष फक्त मराठी चित्रपटसृष्टीतच नाही तर बॉलिवूडमध्येही प्रसिद्ध आहे. मराठी मालिका आणि चित्रपटांनंतर अमृताने बॉलिवूड चित्रपटांमध्येही स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. संपूर्ण देशभरात अमृताच्या अभिनयाचे चाहते आहेत. नुकतीच अमृताने अभिनेता सुबोध भावेच्या 'बस बाई बस' कार्यक्रमात हजेरी





लावली. त्यानंतर नुकतीच अमृताने सोशल मीडियावर सुबोध भावेसाठी खास पोस्ट शेअर केली आहे. अमृता सुभाष इन्स्टाग्रामवर बरीच सक्रिय असते. अनेकदा ती तिचे फोटो, व्हिडीओ आणि कामाचे अपडेट चाहत्यांशी शेअर करताना दिसते. चाहत्यांशी संवाद साधताना दिसते.

## शॉर्ट न्यूज »

### दोनच चेंडू खेळला अन् कमाल केली, जे विराटला जमलं नाही ते बिश्नोईने केलं



**आशिया । महाईन्यूज**

आशिया चषक स्पर्धेत आज भारत-पाक यांच्यात अटीतटीची लढत होत आहे. या लढतीत भारताने पाकिस्तानसमोर १८१ धावांचा डोंगर उभा केला आहे. भारताकडून विराट कोहलीने धमाकेदार फलंदाजी करत ४४ चेंडूंमध्ये ६० धावा केल्या. तर शेवटचे दोन चेंडू खेळायला आलेल्या रवी बिश्नोईनेदेखील अवघे दोन चेंडू खेळून भारताच्या खात्यात आठ धावा जोडल्या. जे विराटला जमलं नाही ते बिश्नोईने करून दाखवलं आहे. विराट कोहली मैदावावर शेवटच्या षटकापर्यंत होता. शेवटच्या षटकात जास्तीत जास्त धावा मिळाव्यात म्हणून त्याने भुवनेश्वर कुमाराला स्ट्राईक दिला नाही. तसेच एकही धाव काढली नाही. परंतु चार चेंडूंमध्ये एकही धाव न काढता विराट बाद झाला.

# पाकिस्तानचा भारतावर चित्तथरारक विजय!

## टीम इंडियाला चुका नडल्या

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।**



यूएईमध्ये सुरू असलेल्या आशिया चषक स्पर्धेमधील आजचा (४ सप्टेंबर) भारत-पाकिस्तान सामना चांगलाच रोमहर्षक ठरला. शेवटच्या षटकापर्यंत दोन्ही संघांमध्ये विजयासाठी संघर्ष पाहायला मिळाला. मात्र हा सामना अखेर पाकिस्तानने पाच गडी राखून जिंकला. भारताने पाकिस्तानसमोर विजयासाठी १८२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. पाकिस्तानच्या मोहम्मद रिझवान, मोहम्मद नवाझ या जोडीने जोरदार फटकेबाजी केल्यामुळे पाकिस्तानला विजयापर्यंत पोहोचता आले. तसेच भारताने क्षेत्ररक्षणामुळे केलेल्या चुकांमुळेदेखील भारताला भारताला पराभवाला सामोरे जावे लागले. अर्शदीप सिंगने सोडलेला झेल भारताच्या पराभवाचे प्रमुख कारण बनला. भारताने दिलेल्या १८२ धावांचा पाठलाग करताना मोहम्मद रिझवान आणि बाबर आझम सलामीला आले. मात्र बाबर अवघ्या १४ धावा करून तंबूत परतला. रवी बिश्नोईने त्याचा बळी घेतला. दुसऱ्या विकेटसाठी आलेला फखर जमानही चांगली कामगिरी करू शकला नाही. १५ धावांवर खेळत असताना त्याला युझवेंद्र चहलने झेलबाद केले. त्यानंतर पाकिस्तानच्या मोहम्मद रिझवान आणि मोहम्मद नवाझ या जोडीने चोख भूमिका बजावली. रिझवानने ५१ चेंडूंमध्ये दोन षटकार आणि सहा चौकार लगावत ७१ धावा केल्या. तर मोहम्मद रिझवानने २० चेंडूंमध्ये दोन चोकार, दोन षटकार लगावत ४२ धावा केल्या. तर खुशदील शाह, असिफ अली या जोडीने संघाला विजयापर्यंत नेलं.

नाणेफेक जिंकून पाकिस्तानने सुरुवातीला फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंत फलंदाजीसाठी आलेल्या भारताने सुरुवातीपासून आक्रमक खेळी केली. सलामीवीर केएल राहुल आणि रोहित शर्मा यांनी मोठे फटके मारत अवघ्या २६ चेंडूंमध्ये भारतासाठी ५० धावा केल्या. मात्र दोघेही २८ धावा करून झेलबाद झाले.

# खो-खो लीगचा प्रयोग उत्तम



**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।**

क्रिकेटमध्ये इंडियन प्रीमियर लीगपासून (आयपीएल) सुरू झालेले व्यावसायिक लीगचे लोण इतर खेळांमध्ये पसरायला वेळ लागला नाही. भारतातील मातीमधील कुस्ती आणि कबड्डीतही लीग आली. खो-खो या आणखी एका भारतीय खेळाचे पहिले पर्व रविवारी पहिल्या विजेतेपदासह संपेल. हो-नाही करता चार वर्षे अनेक आघाडय़ांवर काथ्याकूट केल्यानंतर या वर्षी खो-खो लीग अवतरली. अल्टिमेट खो-खो लीग या नावाने या व्यावसायिक लीगला सुरुवात झाली. भारताचा पारंपरिक मानला जाणारा खेळ हा मातीवरून अधिकृतपणे मॅटवर आला. एक महिन्याच्या व्यग्र कार्यक्रमानंतर आज लीगचा विजेता ठरणार आहे. खेळाचे नियम ठरवण्यापासून, संघमालक निश्चित करणे, खेळाडूंची निवड करणे या सगळय़ात चार वर्षे निघून गेली. अनेक वेगळे नियम अमलात आणले. एक खेळाडू मारला की दोन गुण, डाइव्हला बोनस गुण, पोलवर खेळाडू बाद केला की विशेष गुण, एक बॅच झाली की विश्रांती, आक्रमण करताना खेळाडू बाद करण्यासाठी कुठेही कसाही गडी टिपू शकणारा वजीर असे नियम खो-खोच्या नियमावलीत नव्याने चिकटले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे थेट प्रक्षेपणाच्या माध्यमातून खो-खो घराघरात पोहोचला.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही